RCS No. 66/2026
Exh. 1

रे.क.नं.        /२०२६

**कागल येथील मा. सि.ज.ज्यु.डि.**

**यांचे कोर्टात...**

| | | |
|---|---|---|
| **अब्दुल गुलाब शहाणेदिवाण**<br>व.व.५०,धंदा–शेती, रा.बाचणी,<br>ता.कागल, जि.कोल्हापूर | — | वादी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| **बाळू गणी शहाणेदिवाण**<br>व.व.५०, धंदा–शेती, रा.बाचणी,<br>ता.कागल, जि.कोल्हापूर | — | प्रतिवादी |

Order
Issue suit summons to the defendants for the filing of written statement, documents and settlement issues.The defendants shall file the same within 30 days of service of suit summons.
Dt.07.05.2026 C.J.J.D.Kagal

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.05.07 17:38:38 +0530

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

..२/-

दावा : स्पेसिफिक रिलीफ अॅक्ट कलम ३७ प्रमाणे व सी.पी.सी. कलम ९ प्रमाणे कायम मनाईसाठी,आज्ञार्थी मनाईसाठी व वाटणीसाठी.

कोर्ट फी साठीरुपये ३२,०००.०० पैसे व ज्युरिसडिक्शनसाठी आकारणी रुपये ३२,०००.०० पैसे.

यातील वादींचा दावा असा की,

१) दावा मिळकतीचे वर्णन :-

बाचणी, ता.कागल, जि.कोल्हापूर येथील खालील वर्णनाच्या घर मिळकती व खुल्या जागा.

अ) सि.स.नं.६५ याचे क्षेत्र ३१.५० चौ.मी. ची खुली जागा मिळकत.

ब) सि.स.नं.४८ याचे क्षेत्र २८.४० चौ.मी. ची घर मिळकत.

क) सि.स.नं.५३ याचे क्षेत्र ३०.०० चौ.मी. ची समाईक बोळाची मिळकत.

ड) सि.स.नं.४७ याचे क्षेत्र २.५ चौ.मी. ची समाईक पाण्याचे नळाची जागा.

२) दावा सि.स.नं.६५ या मिळकतीमध्ये वादी,प्रतिवादी व नबी बाळू शहाणेदिवाण यांचा प्रत्येकी १/३ हिस्सा होय. नबी बाळू शहाणेदिवाण यांचा सदर



Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

मिळकतीमध्ये १/३ हिस्सा त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारसांनी वादी यांना दि.२०/०१/२००६ इ.रोजीचे खरेदीपत्राने रक्कम रुपये ५०००/- चे मोबदल्यात खरेदी दिलेला आहे. त्यामुळे दावा सि.स.नं.६५ या मिळकतीमध्ये वादीचा २/३ हिस्सा व प्रतिवादीचा १/३ हिस्सा होय.

३) दावा सि.स.नं.४८ या मिळकतीमध्ये वादीचा १/२ हिस्सा असून प्रतिवादी यांचा १/२ हिस्सा होय. दावा सि.स.नं.५३ ही मिळकत समाईक बोळाची मिळकत असून दावा सि.स.नं.५३ हा समाईक बोळ वादी-प्रतिवादी हे वापरत असतात. यातील प्रतिवादी यांनी दावा सि.स.नं.५३ या समाईक येणे-जाणेच्या बोळामध्ये बेकायदेशीरपणे लोखंडी जिना बसविलेला आहे व गॅलरी काढलेली आहे. त्यामुळे सदर दावा सि.स.नं.५३ या समाईक बोळ जागेतून जाणे-येणेस अडथळा निर्माण झालेला आहे. दावा सि.स.नं. ४७ ही समाईक पाण्याच्या नळाची जागा होय.

४) अशी वस्तुस्थिती असताना व त्याप्रमाणे नोंदी सदर मिळकतींचे सिटी सर्व्हे मालमत्तापत्रक सदरी झालेल्या असताना अलिकडे प्रतिवादीने दांडगाव्याने दावा मिळकतीमधील वादींचे हक्क नाकारले चालू केले.

..४/-

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

तसेच प्रतिवादीनी गावातील काही ग्रामपंचायत सदस्य व गावातील पुढारी यांना हाताशी धरुन दावा मिळकतीमध्ये वादीचा काहीही हक्कसंबंध नाही असा कांगावा सुरु केलेला आहे. वास्तविक दावा मिळकतींच्या सिटी सर्व्हेच्या प्रॉपर्टीकार्ड खातेस झालेल्या नोंदी कायम असून प्रतिवादीने आजतागायत सदर नोंदी कोठेही आव्हानीत केलेल्या नाहीत. त्यामुळे प्रतिवादीचे या बेकायदेशीर कृत्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांस दिनांक ०२/०४/२०२६ इ.रोजी आपले विधीज्ञांमार्फत रजि.पोष्टाने नोटीस पाठविली व वाटणी क़रुन देणेबाबतची मागणी केली. सदरची नोटीस प्रतिवादीस लागू होवून देखील प्रतिवादीने सदर नोटीसीस उत्तर दिलेले नाही अगर वादीनी नोटीसीमध्ये केलेली मागणी पूर्ण करुन दिलेली नाही. या कारणाने वादी यांना प्रतिवादीविरुध्द या मे.कोर्टामध्ये नाईलाजास्तव प्रस्तुतचा दावा या मे.कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे.

५) **दावेस कारण :-**

वादी यांनी प्रतिवादी यांस दिनांक ०२/०४/२०२६ (दोन एप्रिल दोन हजार सव्वीस) इ.रोजी आपले विधीज्ञांमार्फत रजि.पोष्टाने नोटीस पाठविली व वाटणी क़रुन देणेबाबतची मागणी केली. सदरची नोटीस प्रतिवादीस

..५/-

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

लागू होवून देखील प्रतिवादीने सदर नोटीसीस उत्तर दिलेले नाही अगर वादीनी नोटीसीमध्ये केलेली मागणी पूर्ण करुन दिलेली नाही. तसेच त्यानंतर देखील वादी यांना दावा मिळकतींमध्ये समाईक कब्जेवहिवाटीतून हुसकावून लावणेचा प्रयत्न केलेला आहे. त्यावेळी व त्यासुमारास दावेस कारण घडलेले आहे व घडत आहे.

६) **दावेचा तपशिल :-**

| **रुपये पैसे** | |
|---|---|
| १,०००.०० | या कामी कायम मनाई मागितल्याने आकारणी. |
| १,०००.०० | या कामी आज्ञार्थी मनाई मागितल्याने आकारणी. |
| ३०,०००.०० | दावा घर मिळकतींच्या किंमतीपैकी वादीचे हिस्सेची आकारणी. |
| ============ | |
| **३२,०००.००** | **एकूण** |

७) कोर्ट फी साठी आकारणी रुपये ३२,०००.०० पैसे केलेली असून ज्युरीस-डिक्शनसाठी आकारणी रुपये ३२,०००.०० पैसे केलेली आहे व त्यावर योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प बॉम्बे कोर्ट फी ॲक्ट कलम ६ नुसार लावलेला आहे.



Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

८) दावा मिळकती या मे.कोर्ट स्थळसिमेत येत असल्याने प्रस्तुतचा दावा चालविणेचा अधिकार या मे. कोर्टांना आहे.

९) प्रस्तुतचा दावा मुदतीत असून या स्वरुपाचा अन्य कोणताही दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला नाही.

१०) **तरी वादीची विनंती की,**

अ) दावा सि.स.नं.६५ ची वाटणी होवून त्यामधील वादीचा २/३ हिस्सा तुटक होवून, स्वतंत्र होवून मिळावा. तसेच दावा सि.स.नं. ४८ ची वाटणी होवून त्यामधील वादीचा १/२ हिस्सा तुटक होवून, स्वतंत्र होवून मिळावा.

ब) दावा सि.स.नं.५३ या समाईक बोळ जागेमधील प्रतिवादीने बेकायदेशीरपणे बसविलेला लोखंडी जिना व गॅलरी पाडून सदर समाईक बोळ मिळकत खुली करुन मिळणेबाबत प्रतिवादीविरुध्द आज्ञार्थी मनाईचा आदेश करणेत यावा.

क) दावा मिळकतींमधील समाईक कब्जेवहिवाटीतून वादी यास बेदखल करु नये अगर हुसकावून लावू नये म्हणून प्रतिवादीविरुध्द कायम मनाई करणेत यावी.



Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

ड) दावा घर मिळकतींची वाटणी कोर्ट कमिशनर यांची नेमूणक करुन मिळावी.

ड ) वादीचा दावा कोर्ट खर्चासह मंजूर करणेत यावा.

इ) न्यायाचे सर्व हुकूम याच कामी करणेत यावेत.

ई) जरुर तर दावा दुरुस्तीस परवानगी असावी.

.............येणेप्रमाणे दावा असे.

कागल

ता.२४/०४/२०२६

**प्रतिज्ञा**

मी वादी या लेखाद्वारे असे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील दावेमधील सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.आज मु।। कागल,ता.२४/०४/२०२६.



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

## ॲफिडेव्हीट

मी वादी श्री.अब्दुल गुलाब शहाणेदिवाण,व.व.५०,धंदा-शेती, रा.बाचणी, ता.कागल, जि.कोल्हापूर देवाची शपथ घेवून सत्य प्रतिज्ञेवर असे ॲफिडेव्हीट करतो की, वरील दाव्यामधील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मु।। कागल, ता.२४/०४/२०२६.

I Know the Deponent
K.A.K.
(Adv. K.A. Kulkarni)

## प्रतिज्ञा

मी वादी या लेखाद्वारे असे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील ॲफिडेव्हीटमधील सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.आज मु।।कागल,ता.२४/०४/२०२६.

Solemnly Affirmed before me by
Shri Abdul Gulab Shahediwan
Age 50 of Bachni, Kagal who is
identified by Shri K.A. Kulkarni
.............. whom I know personally
Dated :- 24/4/26

Assistant Superintendent